# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-७३ दिनांक:- २५/०३/२०२१

## सार्वजनिक ठिकाणी धुलीवंदन कार्यक्रम करण्यास मनाई संदर्भाने फौजदारी दंड प्रक्रीया संहीता कलम १४४(१)(२) अन्वये आदेश निर्गमित.

सद्यस्थितीत राज्यात व मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पुन्हा वाढत असल्याने दिवसेंदिवस रुग्णसंख्येत वाढ होत आहे. कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. दिनांक २८/०३/२०२१ रोजी होळी, दिनांक २९/०३/२०२१ रोजी धुलिवंदन व दिनांक ०२/०४/२०२१ रोजी रंगपंचमी साजरी होणार असुन नमुद सण-उत्सवांच्या कालावधीत मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रात

अ) सार्वजनिक ठिकाणावरील झाडे/लाकडे तोडणे, जाळणे/दहन करणे

ब) पादचाऱ्यांवर रंगीत पाणी, रंग किंवा पावडर फेकणे अथवा उडविण्याचा प्रयत्न करणे.

क) आरोग्यास अपायकारक होईल अशा रासायनिक रंगांचा वापर करणे.

ड) रंगाचे फुगे, पाण्याचे फुगे अथवा इतर द्रव पदार्थांचे फुगे अथवा प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर करुन फेकल्यामुळे आरोग्यास अपाय व जिवीतास धोका निर्माण होईल असे कृत्य करणे.

इ) सार्वजनिक जागेत अश्लिल शब्द उच्चारणे, घोषणा देणे, अश्लिल गाणी गाणे.

फ) सार्वजनिक जागेत विकृत हावभाव करणे किंवा वाकुल्या व विडंबनाचे प्रदर्शन करणे, भरविणे किंवा चित्रे/प्रतिकृती अथवा कोणत्याही वस्तुचे अथवा उद्देशाचे की, ज्यामुळे एखाद्याची प्रतिष्ठा, योग्यता व नैतिकतेला धक्का पोहचेल,

अशा घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिंकाना कोणताही त्रास, अडथळा, दुखापत, जिवितास /आरोग्यास धोका व शांततेस बाधा अथवा दंगा, मारामारी होवु नये व त्यास प्रतिबंध व्हावा याकरीता तसेच मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड-१९) संसर्ग पसरत असल्याची बाब विचारात घेता, आयुक्तालय कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट व सार्वजनिक सभागृहे इत्यादी ठिकाणी धुलीवंदन कार्यक्रमास मनाई करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नागरीकांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव पाहता होळी व धुलिवंदन हे सण मोठया प्रमाणात एकत्रीत न येता आपले घरीच साधेपणाने सामाजीक अंतराचे पालन करुन साजरे करावे. या करीता सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट व सार्वजनिक सभागृहे इत्यादी ठिकाणी धुलीवंदन कार्यक्रमास मनाई करण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमांवर भा.दं.वि.स कलम १८८ प्रमाणे कारवाई करण्यात येईल. सदरचा आदेश मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये दिनांक २६/०३/२०२१ रोजी ००.०१ ते दिनांक ०६/०४/२०२१ रोजीचे २४.००वाजे पावेतो लागु राहील.

Scanned with CamScanner